# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०६/०४/२०२५ (रविवार)**

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, १ कोटी ६ लाख ५५ हजारांचा मुद्देमाल जप्त, भिवापुर पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन भिवापुर** :— दिनांक ०५/०४/२०२५ रोजी भिवापुर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी खालील प्रमाणे कारवाई करून दोन गुन्हे नोंद केले.

**कारवाई कं १.** भिवापुर पोलीसांनी मौजा तहसिल टी पॉईट भिवापुर येथे नाकाबंदी केली. नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहन टिप्पर ट्रक क्र एम. एच. ४० सी. एम. ४५८७ , २) एम. एच. ४९ बी. झेड. ४९७१, ३) टिप्पर क्र एम. एच. ४० सी. टी. ६९०१ यांना थांबवुन वाहनाची पाहणी केली तिन्ही वाहनामध्ये रेती आढळुन आली. टिप्पर ट्रक क्र एम एच ४० सी एम ४५८७ चा **चालक आरोपी नामे राजेश अवध बघेल,वय ३८ वर्षे, रा. साई मंदीर, वर्धा रोड, नागपुर** याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. **ट्रक मालकाबाबत विचारपुस केली असता राहुल भनारकर ,रा. अयोध्या नगर नागपुर** असे नाव समजले. एम. एच. ४९ बी. झेड. ४९७१ चा **चालक आरोपी नामे योगेश महेश भालेकर, वय ४० वर्षे, रा. जिओ पेट्रोलपंप च्या मागे तरोडी खुर्द, नागपुर** याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. **ट्रक मालकाबाबत विचारपुस केली असता मालक सुरेश रोकडे वय ४५ वर्षे रा. संघर्ष नगर बिडगाव नागपुर** ,असे नाव समजले. टिप्पर क्र एम एच ४० सी टी ६९०१ चा **चालक आरोपी नामे नामे राजेश राधेश्याम भुते, वय ३२ वर्षे, रा. हुडकेश्वर रोड, धामना नागपुर** याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. **ट्रक मालकाबाबत विचारपुस केली असता सदर वाहन त्याच्याच मालकीचे असल्याबाबत माहीती प्राप्त झाली**. नमुद आरोपी

चालकांना रेती कुठुन आणली याबाबत विचारपुस केली असता वाहन मालकांच्या सांगण्यावरून शिवनाडा रेती घाट,ता. पवनी जि.भंडारा येथुन आणल्याची माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष **१) वर नमुद तीन वाहन आणि त्यामधील २४ ब्रास रेती असा एकुण ९१,२०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**कारवाई क्रं २.** भिवापुर पोलीसांनी कारगाव शिवारात, अल झमझम करांडला येथे नाकाबंदी केली. नाकाबंदी दरम्यान **संशयीत वाहन ट्रक क्र.एम एच ३५ ए जे ३१०६** हे वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. **वाहन चालक आरोपी नामे अभय शिवराम गोंडाणे,वय २६ वर्षे, रा. काळा फाटा ता पारशिवनी जि नागपुर** याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. **ट्रक मालकाबाबत विचारपुस केली असता सचिन चंद्रशेखर वाघमारे,वय ३६ वर्षे, रा. हुळकेश्वर रोड नागपुर**,असे नाव समजले. पोलीसांनी पंचासमक्ष **१) ट्रक क्र.एम. एच. ३५ ए. जे. ३१०६ किंमती १५,००,०००/—रूपये आणि ७ ब्रास रेती किंमती ३५,०००/— रूपये असा एकुण १५,३५,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**दोन्ही कारवाई मध्ये एकुण १,०६,५५,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.**

**नमुद वाहन चालक आणि मालक आरोपी तसेच शिवनाडा रेती घाट**,ता. पवनी जि. भंडारा **येथुन रेती भरून देणारा आरोपी यांच्याविरूध्द पोस्टे भिवापुर येथे कलम ३०३(२),३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम,** सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधि **अन्वये २ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.**




**नागपुर ग्रामीण जिल्हयात सावनेर पोलीस स्टेशन अंतर्गत अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांवर २ गुन्हे नोंद , एक माउजर ,एका तलवारी सह अंमली पदार्थ जप्त सावनेर पोलीसांची कारवाई**

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशाने नागपुर ग्रामीण जिल्हयात अवैध शस्त्रांबाबत कारवाई करणे सुरू असुन दिनांक ०५/०४/२०२५ रोजी सावनेर पोलीसांनी अवैध शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीवर २ गुन्हे नोंद केले आहे.

सावनेर पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, सुरेद्र रूपलाल बर्वे ,रा. शक्तीनगर, डब्ल्यूसीएल वाघोडा याच्या जवळ अवैध शस्त्र आहे. अशी माहीती मिळताच

पोलीसांनी तात्काळ **घटनास्थळी डब्लु सी एल क्वार्टर वाघोडा** येथे जावुन पंचासमक्ष नमुद आरोपीच्या घराची घरझडती घेतली असता त्याचे घरामध्ये एक लोखंडी धारदार तलवार मिळुन आल्याने पोलीसांनी **पंचासमक्ष एक लोखंडी धारदार तलवार किंमती ५००/— रूपये जप्त केली.** तेव्हा पोलीसांना माहीती प्राप्त झाली की, आरोपीची दुसरी पत्नी असुन ती **गुजरखेडी, वाघोडा** येथे राहते तिच्या घरी अग्निशस्त्र लपवुन ठेवले आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी गेले असता आरोपी नामे सुरेंद्र रूपलाल बर्वे वय—३० वर्षे ,रा. शक्तीनगर डब्ल्यूसीएल वाघोडा, याची पत्नी घरी हजर मिळुन आली पंचासमक्ष घरझडतीमध्ये आरोपीच्या पत्नीच्या घरी एक देशी बनावटीचे माउजर, तीन पितळी काडतुसांसह मिळुन आले. तसेच प्लॅस्टिक पिशवीमध्ये अंदाजे २५ ग्रॅम गांजा व एक चिलम तसेच एक छोटा फिल्टर कापड ज्याची अंदाजे किमंती २५०/— रूपये असा मुद्देमाल मिळुन आला. पोलीसांनी घटनास्थळावरून **एक देशी बनावटीचा माउजर किंमती २५,००० /— रूपये , तीन काडतुसे किंमती ३०० /— रूपये आणि २५ ग्रॅम गांजा आणि चिलम किंमती २५० /— रूपये असा एकुण २५,५५० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. सदर कारवाईत २ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.**

**आरोपी नामे सुरेंद्र रूपलाल बर्वे, वय—३० वर्ष ,रा. शक्तीनगर डब्ल्यूसीएल वाघोडा याच्यावर कलम ४/२५ भारतीय शस्त्र अधिनियम सहकलम १३५ मपोका अन्वये एक गुन्हा नोंद केला** .तसेच **आरोपी नामे १. सुरेंद्र रूपलाल बर्वे वय—३० वर्ष ,रा. शक्तीनगर डब्ल्यूसीएल वाघोडा आणि २. त्याची पत्नी यांच्या विरूध्द कलम कलम ३, ७, २५ भारतीय शस्त्र अधिनियम सह कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये दुसरा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ५१ लाख १४ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालय रामटेक आणि रामटेक पोलीसांची यांची संयुक्त कारवाई

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक ०५/०४/२०२५ रोजी उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालयाचे पथक आणि रामटेक पोलीस, अवैध धदयांवर कारवाई करणे कामी पेट्रलिंग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या विनापरवाना

रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी खालील प्रमाणे कारवाई करून दोन गुन्हे नोंद केले.

**कारवाई क्रं १.** पोलीसांनी मौदा टी पॉईट, शितलवाडी रामटेक येथे नाकाबंदी केली. नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहन १२ चक्का टिप्पर क्र. एम. एच. ४९ सी.के. ५१६४ हे थांबवुन वाहनाची पाहणी केली असता वाहनामध्ये रेती आढळुन आली. **चालक आरोपी नामे अजय चैनसिंग पटले, वय २८ वर्षे, रा. भरत नगर पारडी, नागपुर याला** परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. **ट्रक मालकाबाबत विचारपुस केली असता विनोद भोयर, रा. भरत नगर पारडी नागपुर** असे नाव समजले. **पोलीसांनी पंचासमक्ष १) १२ चक्का टिप्पर क्र. एम. एच. ४९सी.के. ५१६४ किंमती २५,००,०००/—रूपये आणि त्या मधील १० ब्रास रेती असा एकुण २५,६०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**कारवाई क्रं २.** पोलीसांनी शितलवाडी येथील कृषीउत्पन्न बाजार समिती समोर जवळ नाकाबंदी केली. नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहन **१२ चक्का टिप्पर क .एम एच ४०सी.टी. ९९१०** हे वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. **वाहन चालक आरोपी नामे गेजराज घनश्याम साकुरे, वय २६ वर्षे, रा.दुर्गा मंदिराच्या मागे मौदा त.मौदा** याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. **ट्रक मालकाबाबत विचारपुस केली असता वाहन मालक अमित नंदलाल यादव, रा.केसलापुर,ता.मौदा, जि. नागपुर** असे नाव समजले.पोलीसांनी पंचासमक्ष **१) १२ चक्का टिप्पर क .एम. एच. ४०सी.टी. ९९१० किंमती २५,००,०००/—रूपये आणि ९ ब्रास रेती किंमती ५४,०००/—रूपये असा एकुण २५,५४,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**दोन्ही कारवाई मध्ये एकुण ५१,१४,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.**

**नमुद वाहन चालक आणि मालक यांच्यावर पोस्टे रामटेक येथे कलम ३०३(२),३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधि. अन्वये २ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## २० लाख ३० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त उमरेड पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन उमरेड**:—दिनांक ०५/०४/२०२५ रोजी उमरेड पोलीस , पोलीस स्टेशन हददीत अवैध धंदयांवर कारवाई करणे कामी पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे मौजा बायपास चौक, उमरेड येथे नाकाबंदी केली असता टिप्पर क्रमांक **एम. एच. ४० बी.एल. ९२३४** हे मिळुन आले. **टिप्पर चालकाला त्याचे नाव पत्ता विचारले असता चालक नामे शेख गफ्फार इलाही,वय ५० वर्षे, रा. प्लॉट क्र १०१ डीव्ही पब्लीक स्कुल हसनबाग नंदनवन नागपुर,अशी माहीती प्राप्त झाली.** वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. चालकाला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष **१) टिप्पर क्र एम एच ४० बी एल ९२३४ किंमती २०,००,०००/— रूपये आणि २) ६ ब्रास रेती किंमती ३०,०००/— रूपये असा एकुण २०,३०,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**टिप्पर चालक आरोपी नामे शेख गफ्फार इलाही,वय ५० वर्ष, रा प्लॉट क्र १०१ डीव्ही पब्लीक स्कुल हसनबाग नंदनवन नागपुर याच्या विरूध्द पोस्टे उमरेड येथे कलम ३०३(२),४९ भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम,सह कलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम ,सह कलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## ४५ लाख ६० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त,मौदा पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक ०५/०४/२०२५ रोजी मौदा पोलीस , पोलीस स्टेशन हददीत अवैध धंदयांवर कारवाई करणे कामी पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे.

मिळालेल्या माहीतीच्या आधार  स्वप्नील ढाबा समोर वडोदा येथे नाकाबंदी केली असता एक विनाक्रमांकाचा संशयीत ट्रक मिळुन आला. वाहन चालकाला ट्रक क्रमांक विचारला असता त्याने एम.एच ४० सी.टी ८३६४ हा ट्रक क्रमांक सांगितला. **वाहन चालकाला त्याचे नाव पत्ता विचारले असता  रविन्द्र शिवराम भुते, वय ३७ वर्षे, रा भिलेवाडा, जिल्हा भंडारा अशी माहीती प्राप्त झाली.** वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. चालकाला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. ट्रक मालकाबाबत विचारपुस केली असता **मालक आकर्ष अरुण बांन्ते, वय ३५ वर्षे, रा. भिलेवाडा जि. भंडारा असे नाव समजले.** पोलीसांनी पंचासमक्ष **१)  ट्रक क्र एम.एच. ४० सी.टी. ८३६४ किंमती ४५,००,०००/—रूपये २) १० ब्रास रेती किंमती ५०,०००/— रूपये आणि ३)  एक ॲड्रॉईड मोबाईल किंमती १०,००० /— रूपये असा एकुण ४५,६०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

नमुद वाहन चालक आणि मालक  याच्या विरूध्द पोस्टे मौदा येथे  **कलम ३०३(२),४९ भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम,सह कलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम ,सह कलम** कलम ५०,१७७ मोवाका **अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने